आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

६ जुलै २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून चार दिवस ओदिशा दौऱ्यावर
- देशांतर्गत बाजारात कांद्याची पुरेशी उपलब्धता असल्याची केंद्रसरकारची ग्वाही
- २०२४ मधे जागतिक तृणधान्य उत्पादन २८५ कोटी टन पेक्षा जास्त होण्याचा संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषि संघटनेचा अंदाज
- ब्रिटनच्या हाऊस ऑफ कॉमन्समध्ये भारतीय वंशाचे २९ संसद सदस्य / लिसा नंदी यांना मंत्रीपद

  **आणि**

- भारत विरुद्ध झिम्बाब्वे टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना आज झिम्बाब्वेत हरारे इथं रंगणार

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून चार दिवसांच्या ओदिशा दौऱ्यावर आहेत. त्या उद्या पुरी इथं भगवान जगन्नाथ, भगवान बालभद्र, सुभद्रा देवी आणि भगवान सुदर्शन यांच्या रथ यात्रेत सहभागी होणार आहेत. आज संध्याकाळी भुवनेश्वर इथं उत्कलमणी गोपालबंधू दास यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात भाग घेतील. सोमवारी त्या ऐतिहासिक उदयगिरी आणि खंडगिरी गुंफांना भेट देऊन नंतर बिभूती कानूंगो महाविद्यालय आणि उत्कल विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. मंगळवारी दिल्लीला परतण्यापूर्वी राष्ट्रपती भुवनेश्वर जवळ ब्रम्हकुमारी केंद्राला भेट देणार असून त्यानंतर त्या राष्ट्रीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेच्या १३ व्या पदवीदान समारंभाला उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

रब्बी हंगामातल्या कांद्याची बाजारातली आवक वाढत असल्यामुळे कांद्याचे दर स्थिर होत असल्याचं केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं सांगितलं. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा कांद्याचं उत्पादन कमी होऊनही देशातल्या बाजारात कांद्याची पुरेशी उपलब्धता आहे. त्याचबरोबर यंदाच्या रब्बी हंगामात कांद्याचं अंदाजित उत्पादन १९१ लाख टन असून देशातल्या ग्राहकांची गरज भागवण्यासाठी ते पुरेसं  आहे, अशी माहितीही या मंत्रालयानं दिली आहे. यंदा तीन लाख ६१ हजार हेक्टर परिसरात खरीपातल्या कांद्याची लागवड करायचं उद्दिष्ट असून ते गेल्या वर्षीपेक्षा १२ टक्के जास्त असेल. त्याचबरोबर खरीप हंगामात देशात दोन लाख ७२ हजार हेक्टरवर टोमॅटोची लागवड करण्याचं उद्दिष्ट असल्याचं कृषी मंत्रालयानं सांगितलं.

<><><><><>

संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषि संघटनेनं २०२४ या वर्षीचा जागतिक तृणधान्य उत्पादनाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यानुसार यंदा २८५ कोटी टन पेक्षा जास्त तृणधान्य उत्पादनाची शक्यता आहे. अर्जेंटीना, ब्राझिल, टर्की आणि युक्रेन मध्ये मक्याचं उत्पादन अधिक होईल तर आशिया मध्ये गव्हाचं उत्पादन चांगलं होईल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. धान्याच्या एकंदर उत्पादनापैकी तांदूळ आणि भरड धान्याचा वाटा सर्वाधिक राहील. २०२४-२५ मध्ये जागतिक तृणधान्याचा साठा ३० पूर्णांक ८ दशांश टक्क्यांवर राहील तर २०२५ मध्ये जागतिक तृणधान्याचा साठा १ पूर्णांक ३ दशांश टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज आहे. जगात तांदळाचं विक्रमी उत्पादन ५३ कोटी ५२ लाख टनांपेक्षा जास्त होईल असा अंदाज आहे.

<><><><><>

माजी उप प्रधानमंत्री दिवंगत बाबू जगजीवन राम यांच्या ३८व्या पुण्यतिथी दिनी आज त्यांना देशभरात आदरांजली वाहण्यात येत आहे. बाबू जगजीवन राम यांच्या कन्या आणि लोकसभेच्या माजी सभापती मीरा कुमार यांनी नवी दिल्लीतल्या समता स्थळाचं दर्शन घेऊन त्यांना पुष्पांजली वाहिली. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात बाबू जगजीवन राम यांनी सक्रिय भूमिका घेतली होती.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांना आज त्यांच्या जयंती दिनानिमित्त आदरांजली वाहिली. डॉ. मुखर्जी यांनी मातृभूमीसाठी केलेला त्याग आणि बलिदान देशवासियांना प्रेरणा देत राहील, असं मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

डॉ. मुखर्जी यांनी देशाची एकता आणि अखंडतेसाठी लढा दिला. जनसंघाच्या स्थापनेतून देशाला आदर्शवादाची आणि राष्ट्र प्रथम या विचारांची देणगी दिली, असं  अमित शहा यांनी म्हटलं आहे.

भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी दिल्लीतल्या भाजपा मुख्यालयात डॉ. मुखर्जी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली.

<><><><><>

नीती आयोगाच्या संपूर्णता अभियानाला देशभरात सुरुवात झाली आहे. येत्या ३० सप्टेंबरपर्यंत देशातल्या ५०० तालुक्यात हे अभियान राबवलं जाणार आहे. महाराष्ट्रातल्या २७ तालुक्यांचा या अभियानात समावेश झाला आहे. संपूर्णता

अभियानामध्ये गर्भवती महिलांची प्रसुतीपूर्व काळजी आणि त्यांना पोषक आहार, मधुमेह आणि उच्च रक्तदाब असणाऱ्या व्यक्तींची तपासणी आणि उपचार, माती परीक्षण आणि बचतगटांना मिळणारा फिरता निधी, शाळेतील विद्यार्थ्यांचा संक्रमण दर, तसंच १० वी आणि १२ वीमधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी यावर प्राधान्यानं भर दिला जाणार आहे.

**<><><><><>**

ब्रिटनचे नवे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांनी भारतीय वंशाच्या ब्रिटीश खासदार लिसा नंदी यांची संस्कृती, माध्यम आणि क्रीडा या विषयांसाठीच्या परराष्ट्र मंत्री म्हणून नियुक्ती  केली आहे. लिसा या उत्तर-पश्चिम इंग्लंडमधील विगनमधून प्रचंड बहुमताने पुन्हा निवडून आल्या आहेत. लिसा या कोलकात्याचे शिक्षण तज्ज्ञ दिपक नंदी यांच्या कन्या आहेत. ब्रिटनच्या सार्वत्रिक निवडणुकीत हाऊस ऑफ कॉमन्समध्ये सुमारे २९ भारतीय वंशाचे संसद सदस्य विक्रमी संख्येने निवडून आले आहेत.

**<><><><><>**

इराणच्या सार्वत्रिक निवडणुकीत इस्लामी मूलतत्त्ववादी सईद जलीली यांचा पराभव करुन माजी आरोग्यमंत्री मसूद पेजस्कियान १४वे राष्ट्राध्यक्ष बनणार आहेत. मतदानाच्या काल झालेल्या दुसऱ्या फेरीत त्यांना तीन कोटी मतांपैकी एक कोटी साठ लाख मतं पडली. २८ जून रोजी मतदानाच्या पहिल्या टप्प्यात पेजस्कियान यांना एकूण मतांपैकी ४२ पूर्णांक सहा दशांश टक्के मतं पडली होती, तर त्यांचे प्रतिस्पर्धी सईद जलीली यांना ३८ पूर्णांक आठ दशांश टक्के मतं पडली होती.

इराणच्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत एकूण मतांच्या पन्नास टक्के मतं पडणं आवश्यक असतं, त्यामुळे काल दुसऱ्या टप्प्यातलं मतदान घेण्यात आलं.

पेजस्कियान यांनी सत्ता मिळाल्यावर खुलं धोरण स्वीकारण्याचं तसंच अण्वस्त्रविषयक करारावर पाश्चात्य देशांबरोबर वाटाघाटी करण्याचं आश्वासन दिलं आहे.

**<><><><><>**

NBEMS अर्थात वैद्यकशास्त्र राष्ट्रीय परीक्षा मंडळाद्वारे घेतली जाणारी फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएट परीक्षा आज होत आहे. परदेशातून वैद्यकीय पदवी घेणाऱ्या डॉक्टरांना भारतात वैद्यकीय क्षेत्रात काम करण्यासाठी ही परीक्षा द्यावी लागते. देशभरात ५० शहरातल्या ७१ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा होत आहे. कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी २५५ निरीक्षक आणि ५३ प्राध्यापकांच्या फिरत्या पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रश्नपत्रिका डाऊलोड झाल्या असून परीक्षा सुरळीत सुरू झाल्याचं NBEMS नं सांगितलं आहे.

**<><><><><>**

काँग्रेस नेते राहुल गांधी आज गुजरातच्या दौऱ्यावर जाणार असून ते अहमदाबादमधे पक्षकार्यकर्त्यांना संबोधित करणार आहेत. याशिवाय ते राजकोट इथं क्रीडासंकुल आग दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबियांना भेटणार आहेत. तसंच पोलीस कोठडीत असलेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या कुटुंबियांनाही भेटतील. लोकसभेत राहुल गांधी यांनी केलेल्या वक्तव्यावरुन अहमदाबादमधे प्रदेश काँग्रेस कार्यालयासमोर भाजपा आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमधे चकमक उडाली होती. त्या पार्श्वभूमीवर हा दौरा होत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

भारत विरुद्ध झिम्बाब्वे या टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना आज झिम्बाब्वेत हरारे इथं होणार आहे. शुभमन गिल भारतीय संघाचं नेतृत्व करत आहे.

भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी साडेचार वाजता सामन्याला सुरुवात होईल. भारताच्या रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा या दिग्गज क्रिकेटपटूंनी टी-ट्वेंटी क्रिकेटमधून निवृत्ती स्विकारल्यानंतर भारताची ही पहिलीच आंतरराष्ट्रीय टी-ट्वेंटी क्रिकेट मालिका आहे. अनेक ज्येष्ठ खेळाडूंच्या अनुपस्थितीत खेळत असलेल्या या संघात आयपीएलमध्ये दमदार कामगिरी केलेल्या अभिषेक शर्मा, रियान पराग आणि तुषार देशपांडेसह युवा खेळाडूंचा सहभाग आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये, दक्षिण आफ्रिकेनं टी-ट्वेंटी सामन्यांच्या मालिकेत पहिल्या सामन्यात भारताचा १२ धावांनी पराभव केला. दक्षिण अफ्रिकेनं प्रथम फलंदाजी करताना १८९ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल भारतीय महिला संघ २० षटकांत १७७ धावा करू शकला.

**<><><><><>**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेतल्या पुरुष दुहेरीत भारताचा रोहन बोपन्ना आणि त्याचा ऑस्ट्रेलियन जोडीदार मॅथ्यू एबडन यांचा सामना जर्मनीच्या हेंड्रिक जीबीन्स आणि कॉन्स्टॅनटिन फ्रॅन्टझन यांच्याशी आज संध्याकाळी होणार आहे. रोहन बोपन्ना आणि मॅथ्यू एबडन यांच्या जोडीने रॉबीन हस आणि सँडर अॅरेंड्स यांना ७-५, ६-४ असं हरवून दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळवला आहे.

**<><><><><>**

आसाममधलं जनजीवन पुरामुळे विस्कळीत झालं असून राज्यातल्या तीस जिल्ह्यातल्या २४ लाख लोकांना याचा फटका बसला आहे. गुवाहटी शहरात अनेक ठिकाणी पाणी तुंबल्यामुळे वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. तसंच पुरामुळे ४७ हजार लोकांना मदत छावण्यांमध्ये आश्रय घेणं भाग पडलं आहे. उर्ध्व

आसाममध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे अमरनाथ यात्रा आज तात्पुरत्या स्वरूपात स्थगित केली आहे. बालताल आणि पेहलगाम या दोन्ही मार्गांवर सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे ही यात्रा तात्पुरती स्थगित केल्याची माहिती एका अधिकाऱ्यानं दिली आहे.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागाने आज पंजाब, हिमाचल प्रदेश, हरयाणा, चंदिगढ, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश या राज्यांत अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. तर उत्तराखंड, छत्तीसगढ आणि पूर्वांचल भागात उद्यापर्यंत मुसळधार पाऊस कायम राहील असा अंदाज वर्तवला आहे.

आजपासून पुढचे दोन दिवस ओडिशा आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडेल. कोकण किनारपट्टीवर सोसाट्याच्या वाऱ्यासह विजांचा कडकडाट आणि पाऊस होण्याची शक्यता आहे. तर पश्चिम बंगाल, सिक्कीम, बिहार, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरा या राज्यांत ९ जुलैपर्यंत मुसळधार पावसाची शक्यता आहे.